केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - या योजनेंतर्गत वाणिज्यिक पिके, कापूस व ऊस यांकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करणेबाबत. ( लेखाशिर्ष २४०१ अे५७५ (केंद्र हिस्सा) व लेखाशिर्ष २४०१ अे५८४ ( राज्य हिस्सा) आणि लेखाशिर्ष २४०१ A५९३ (केंद्र हिस्सा ) व लेखाशिर्ष २४०१ A६०१ (राज्य हिस्सा).

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.११ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - १७ ऑक्टोबर, २०१७.

**वाचा -**

१) शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
४) केंद्र शासन,पत्र क्रमांक F.No. २-९ / २०१५-CU-IV, दि. १९ जुलै, २०१७.
५) कृषि व पदुम विभाग, नस्ती क्र. असुअ- ०९१७ / प्र. क्र. १११ /राकृवियो.

**शासन निर्णय-**

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - वाणिज्यिक पिके (कापूस व ऊस ) अंतर्गत मागणी क्र. टी-५, २४०१ पीक संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) आदिवासी उपयोजनेंतर्गत योजना, (०१) (२३) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - कापूस केंद्र हिस्सा (२४०१ A५७५ ), ३३- अर्थसहाय्य खाली रु. ८.६७ लाख तर त्यास समरुप राज्य हिश्याकरिता (०१) (२४) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - कापूस (राज्य हिस्सा ) ( २४०१ A५८४) याखाली रु. ५.७८ लाख आणि (०१) (२५) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - ऊस केंद्र हिस्सा (२४०१ A५९३ ), ३३- अर्थसहाय्य खाली रु. १२.२४ लाख तर त्यास समरुप राज्य हिश्याकरिता (०१) (२६) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - ऊस (राज्य हिस्सा ) ( २४०१ A६०१ ) याखाली रु. ८.१६ लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता उपरोक्त योजनेंतर्गत कापूस पिकाकरिता रु. १.२७ लाख तर ऊस पिकाकरिता रु. ८.०६ लाख इतका निधी वितरीत केलेला आहे. त्यानुषंगाने कृषि व पदुम विभागाच्या वाचा क्र.५ येथील प्रस्तावास अनुसरुन कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिके या योजनेअंतर्गत (०१) (२३) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके- कापूस केंद्र हिस्सा (२४०१ A५७५ ), ३३- अर्थसहाय्य खाली रु.१.२७ लाख (अक्षरी रुपये एक लाख सत्तावीस हजार फक्त) तर त्यास समरुप राज्य हिश्याकरिता (०१) (२४) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके -कापूस (राज्य हिस्सा ) ( २४०१ A५८४) याखाली रु.०.८५ लाख ( अक्षरी रुपये पंच्याऐंशी हजार फक्त ) आणि (०१) (२५) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - ऊस केंद्र हिस्सा (२४०१ A५९३ ), ३३- अर्थसहाय्य खाली रु. ८.०६ लाख ( अक्षरी रुपये आठ लाख सहा हजार फक्त ) तर त्यास समरुप राज्य हिश्याकरिता (०१) (२६) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - ऊस (राज्य हिस्सा ) ( २४०१ A६०१ ) याखाली रु. ५.३७ ( अक्षरी रुपये पाच लाख सदतीस हजार फक्त ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र.३६६ / अर्थोपाय, दि. ०८-०८-२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१७१४३०२७३१२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2017.10.17 17:56:36 +05'30'

**( रविंद्र दि. औटे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव ( कृषि ) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग ( अर्थसंकल्प- १९ ), मंत्रालय, मुंबई.
६. कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग